## FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**1. District (जिल्हा):** कोल्हापुर **P.S.(ठाणे):** लक्ष्मीपूरी **Year (वर्ष):** 2018

**FIR No.(प्रथम खबर** 0122 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 09/06/2018 09:14 बजे

**2.**

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 13(1)d |
| 3 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 13 |

**3. (a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

**1. Day** शुक्रवार **Date From (दिनांक** 08/06/2018 **Date To ( दिनांक पर्यंत):** 08/06/2018

**Time Period (कालावधी):** पहर 5 **Time From** 13:27 बजे **Time To (वेळेपर्यंत):** 15:35 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले** **Date (दिनांक ):** 08/06/2018 **Time (वेळ):** 22:56 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा** **Entry No. (नोंद क्र.):** 046 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 08/06/2018 22:56 बजे

**4. Type of Information (माहितीचा प्रकार):** Oral

**5. Place of Occurrence (घटनास्तळ):**

**1. (a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा):** पश्चिम, 500 किमी **Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** अभिलेख विभाग तहसिल कार्यालय को

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे** **District(State) (जिल्हा**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** ACB

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती का नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 01/08/1894 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी.**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (अदा केल्याची**

**Place of Issue (अदा केल्याची ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving**

| S.No.(अ.क्र.) | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | पोलीस उपअधिक्षक अँन्टी करप्शन ,कोल्हापुर,लक्ष्मीपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | पोलीस उपअधिक्षक अँन्टी करप्शन ,कोल्हापुर,लक्ष्मीपूरी,कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No.(अ. | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | खेंबर शरपुद्दीन नायकवडी | | | 1. नायकवडी गल्ली कागल ताकागल,कोल्हापुर,कागल, कोल्हापुर,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (क्र. | Property Category (संपत्ति श्रेणी) | Property Type (सम्पत्ति का | Description (विवरण) | Value(In Rs/-) (मूल्य (रु |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | अत्तर बनविण्यास उपयुक्त गवत | 3000/ रूपये | 3,000.00 |

10. **Total value of property (In Rs/-)-सम्पत्ति का कुल मूल्य(रु में):** 3,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any (मृत्यु समीक्षा रिपोर्ट / यू°डी°प्रकरण सं., यदि कोई हो ):**

| S.No. (क्र.सं.) | UIDB Number (यू°डी°प्रकरण सं.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम सूचना तथ्य ):**

फिर्यादी जबाब ता.08/06/2018मी गिरीश श्रीपती गोडे वव.50 पोलीस उपअधिक्षक,अँन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापुर,समक्ष सरकारतर्फे फिर्याद देतो की, मी दि.04/05/2017 रोजीपासुन पोलीस उप अधिक्षक या पदावर अँन्टी करप्शन ब्युरो,कोल्हापुर येथे कार्यरत आहे.मी दि.08/06/2018 रोजी कार्यालयात हजर असताना तक्रारदार श्री.भिकाजी बापु वाडकर वव.42 व्यवसाय-शेती रा.दिंडनेर्ली ता.करविर जि.कोल्हापुर यांनी समक्ष हजर होवुन तक्रार दिली ती खालीलप्रमाणे आहे. मी वरील गावी माझे कुटुंबियासह राहणेस आहे.आमची दिंडनेर्ली ता.करविर येथे शेतजमीन असुन ती मी कसतो.आमचे भावकीतील नातेवाईकांना मराठा कुनबी जातीचा दाखला प्राप्त केलेला आहे.त्याप्रमाणे मलाही मराठा कुनबी जातीचा दाखला काढावयाचा आहे.त्यासाठी मला आमचे शेत जमिनींचा महसुली पुरावा म्हणुन सन 1950 सालचे 7/12 उता-याची आवश्यकता आहे.आमची दिंडनेर्ली गावी जमीन गट क्र 566,632/1,632/2,705,708,800,804,799,805 यामध्ये एकुन सात एकर शेतजमीन असुन ती माझे तसेच माझी बहीण व आई यांचे नावावर आहे.त्या जमीनींचे सन 1950 चे 7/12 उतारे मिळणेसाठी मी दि.22/05/2018 रोजी तहसीलदार करविर मधील आवक जावक विभागात विहीत नमुन्यातील अर्ज दिलेला असुन त्यांनी मला पोहोच दिलेली आहे. त्यानंतर मला समजले की तहसिल कार्यालय करविर मधील अव्वल कारकुन श्री नायकवडी यांचेकडे रेकर्ड विभाग असुन त्यांचेकडुन 7/12 उतारे मिळतात असे समजलेने मी अर्ज दिलेनंतर चार दिवसांनी करविर तहसिल कार्यालयात जावुन तेथील अव्वल कारकुन श्री नायकवडी यांना भेटलो व मी दिलेल्या अर्जाची पोहोच दाखवुन लवकरात लवकर उतारे देण्याविषयी विनंती केली तेंव्हा त्यांनी मला तुमचे रेकर्ड जास्त आहे ते शोधुन द्यायला वेळ लागेल तुम्ही दि.02/06/2018 रोजी या असे मला सांगुन माझेकडील पोहोचवर 2/6 अशी तारीख तसेच माझे रेकर्ड शोधणा-यांचे नाव शिवाजी असे लिहुन दिले. त्यानंतर मी दि.02/06/2018 रोजी पुन्हा तहसिलदार कार्यालय करविर येथे जावुन अव्वल कारकुन नायकवडी यांना भेटलो असता त्यांनी मला तुमचे रेकर्ड जास्त आहे ते शोधुन काढायला वेळ लागतो तुम्ही नंतर या असे मला सांगितले.त्यानंतर मी पुन्हा तीन ते चार वेळा जावुन त्यांना भेटलो परंतु ते मला काहीतरी कारण सांगुन माझे उतारे देण्यास टाळाटाळ करत होते.त्यानंतर मी दि.06/06/2018 रोजी पुन्हा नायकवडी यांना जावुन भेटलो व उतारे देण्याविषयी विनंती केली असता त्यांनी मला तुमचे काम जास्त आहे त्याला 4500/- रु खर्च येईल असे सांगितले तेंव्हा त्यांनी माझेकडुन 1700/- रु फी म्हणुन घेतले व एक रीम कोरे कागद घेतले परंतु त्याची पावती मला दिली नाही.व त्यांनी मला दि. 08/06/2018 रोजी राहिलेले 3000/- रुपये घेवुन या तुमचे उतारे देतो असे सांगितले आहे. श्री नायकवडी,अव्वल कारकुन, तहसिल कार्यालय करविर जि.कोल्हापुर हे माझेकडे मागत असलेले 3000/- रुपये हे ते लाच म्हणुनच मागत असलेची माझी खात्री झालेली आहे.परंतु माझी श्री.नायकवडी यांना लाच देण्याची इच्छा नाही.म्हणुन आपले मार्फत श्री. नायकवडी यांचेवर कारवाई होणेसाठी मी सदरचा तक्रार अर्ज देत आहे. श्री नाययकवडी यांचेशी माझे कोणतेही वयक्तीक हेवेदावे अगर आर्थिक देणेघेणे नाही. तसेच श्री नायकवडी यांना लाच म्हणुन देणेसाठी लागणारी रक्कम ही माझे शेती व्यवसायातील रकमेतुन देणार आहे.तरी त्यांचेवर कारवाई होणेस विनंती आहे.आता मी आपलेकडे मी दिलेल्या अर्जाच्या पोहोचची छायांकीत प्रत हजर करत आहे अशा मजकुराचा तक्रार अर्ज आहे. तक्रारदार यांचे तक्रारीतील लोकसेवक श्री. नायकवडी काम करीत असलेले तहसिल कार्यालय,करविर हे आमचे कार्यालयापासुन जवळ असलेने तक्रारदार यांचा लोकसेवक श्री नायकवडी यांना कोणत्याही प्रकारचा संशय येवु नये म्हणुन आम्ही राहत असलेल्या रमणमळा येथील आमचे शासकीय निवासस्थानी जावुन तेथुन श्री नायकवडी यांचे लाच मागणीबाबत पडताळणीचे कामकाज करणेचे आम्ही ठरविले त्यानुसार आम्ही तक्रारदार व सापळा पथकातील कर्मचारी यांचेसह सापळा कारवाईसाठी लागणारे साहित्य घेवुन एसीबी ऑफीस येथुन आमचे रमणमळा येथील शासकीय निवासस्थानी गेलो.आम्ही लागलीच उपसंचालक भुविज्ञान व खनीकर्म संचलनालय महाराष्ट्र शासन उद्योग भवन कोल्हापुर यांचे कार्यालयाकडील 1) श्री दत्तात्रय बळवंत मोरे भौगोलीक माहीती प्रणाली सहायक 2) श्री दिपक साहेबराव माने सहाय्यक आवेधक यांना पंच म्हणुन उपलब्ध करुन घेतले त्यानंतर आम्ही तक्रारदार श्री वाडकर यांची दोन्ही पंच यांची आपसात ओळख करुन दिली तेंव्हा आमचे सुचनेवरुन तक्रारदार यांनी त्यांची तक्रार पंचाना तोंडी सांगितली तसेच तक्रारदार यांचा तक्रारी अर्ज पंचांना वाचणेस दिला त्यानंतर त्या तक्रारीवर आम्ही तसेच दोन्ही पंचानी सह्या केल्या आम्ही तक्रारदार व दोन्ही पंच यांना अव्वल कारकुन नायकवडी तक्रारदार यांचेकडे लाचेची मागणी करतात अगर कसे याबाबतची प्रथम पडताळणी करणार आहोत असे सांगितले.व त्यांना पडताळणी कारवाईबाबत योग्य त्या सुचना दिल्या तसेच अव्वल कारकुन नायकवडी यांना तहसिल कार्यालय करविर येथे भेटलेनंतर पुन्हा शासकीय निवासस्थान रमणमळा येथे परत येणेबाबत सुचना दिली त्यानंतर डिजीटल व्हाईस रेकर्डर चालु करुन तक्रारदार यांचे शर्टचे आतील बाजुस ठेवला आणी तक्रारदार व पंच श्री मोरे यांना आमचे शासकीय निवासस्थानातुन 13.27 वा करविर तहसिलदार कार्यालयाकडे जाणेसाठी रवाना केले त्यानंतर 14.19 वा तक्रारदार व पंच श्री मोरे करविर तहसिलदार कार्यालय येथे अव्वल कारकुन नायकवडी यांची भेट घेवुन आमचे निवासस्थानी परत आले तेंव्हा तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकर्डर बंद करुन ताबेत घेतला त्यावेळी पंच श्री मोरे व तक्रारदार यांनी सांगितलेल्या हकीगतीवरुन आणी डिजीटल व्हाईस रेकर्डरमध्ये तक्रारदार व अव्वल कारकुन नायकवडी यांचेतील प्रत्यक्ष भेटीवेळी ध्वनीमुद्रीत झालेले संभाषन ऐकले असता नायकवडी यांनी तक्रारदार यांचेकडे दिंडनेर्ली ता.करविर गावचे हद्दीतील त्याचे मालकीचे शेतजमीणीचे 7/12 उतारे देणेसाठी तडजोडीअंती पाच ते सहा हजार द्यावे लागतील असे म्हणुन लाच मागणी केलेचे निष्पन झाले त्यावेळी आम्ही डिजीटल व्हाईस रेकर्डर मधील ध्वनी मुद्रीत झालेल्या संभाषनाचे मेमरी कार्ड जप्त करुन ताबेत घेतले. आम्ही लागलीच तक्रारदार यांचेकडुन अव्वल कारकुन नायकवडी यांना लाच म्हणुन देणेसाठी त्यांचेकडे उपलब्ध असलेले 3000/- रुपये हजर करुन घेतले.त्यामध्ये 500/- रुपये दराच्या 6 नोटा होत्या.त्या नोटांचे नंबर्स लिहुन घेवुन त्या नोटांना पोहेक श्री सावंत यांचेमार्फत अँन्थसिन पावडर लावली व नोटांची अल्टाव्हायलेट लँम्पचे सहाय्याने तपासणी करुन दाखवली.त्यानंतर त्या नोटा तक्रारदार यांचे शर्टचे खिशात ठेवल्या.आम्ही अव्वल कारकुन नायकवडी यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतर तक्रारदार यांनी लाच स्विकारलेचा इशारा म्हणुन आपले शर्टचे उजवे हाताची बाही डावे हाताने वर करावी अशी सुचना दिली तसेच तक्रारदार,दोन्ही पंच व रेडींग पार्टीतील कर्मचारी यांना सापळ्याचे अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या.त्यानंतर पुन्हा डिजीटल व्हाईस रेकर्डर चालु करुन तो दोरीच्या साहाय्याने तक्रारदार यांचे अंगातील शर्टचे आतील बाजुस गळ्यात अडकविला आम्ही तक्रारदार व पंच श्री मोरे यांना तक्रारदार यांचेकडील मोटर सायकलने करवीर तहसील कार्यालयाकडे अव्वल कारकुन नायकवडी यांची भेट घेण्यासाठी 14.54 वा.रवाना केले.त्यांचे पाठोपाठ आम्ही पंच श्री माने व स्टाफसह आमचेकडील खाजगी मोटर सायकलवरुन जाणेसाठी निघालो.करवीर तहसील कार्यालयासमोर रस्त्याकडेला तक्रारदार यांनी मोटर सायकल पार्क करुन ते पंच श्री मोरे यांचेसह कार्यालयात गेले.तेव्हा आम्ही पंच नं.2 व स्टाफ करवीर तहसिल कार्यालयाचे आवारात कोणास संशय येणार नाही अशा रितीने थांबुन राहिलो. काहीवेळाने तक्रारदार व त्यांचेसोबत एक इसम तहसिल कार्यालयाचे मागील दरवाजाने बाहेर येवुन ते बीएसएनएल ऑफीससमोर सीपीआर ते भवानी मंडपकडे जाणारे रस्त्याकडेला येवुन बोलत थांबले त्यावेळी तक्रारदार यांनी आम्ही दिले सुचनेप्रमाणे त्यांनी अव्वल कारकुन नायकवडी यांनी लाच स्विकारलेचा इशारा म्हणुन आपले शर्टचे उजवे हाताची बाही डावे हाताने वर केली.त्यावेळी आम्ही सर्वजण त्यांचेजवळ जावुन अव्वल कारकुन नायकवडी यांना रंगेहात पकडले.आम्ही नायकवडी यांचेकडे त्यांचे नाव,पद,पत्ता याची चौकशी केली असता त्यांनी आपले नाव खँबर शरपुद्दीन नायकवडी व.व. अव्वल कारकून अभिलेख विभाग तहसिलदार कार्यालय करवीर कोल्हापूर रा.नायकवडी गल्ली कागल ता.कागल असे सांगितले.सापळा कारवाईवेळी अव्वल कारकुन नायकवडी यांनी तक्रारदार यांना अभिलेख कक्षातुन त्यांचे शेताचे 7/12 उतारे काढुन देवुन त्याबद्दल तक्रारदार यांचेकडे पैसे मागितले असता तक्रारदार यांनी आपले शर्टचे खिशातुन 3,000/-रुपये लाच रक्कम काढुन ती अव्वल कारकुन नायकवडी यांचेसमक्ष धरली असता त्यांनी ती आपले उजवे हातात घेवुन आपले शर्टचे खिशात ठेवली.सदरची लाच रक्कम हस्तगत करणेत आली असुन ती जप्त करणेत आली आहे .तसेच सदरबाबत दि.8/6/2018रोजी 13.10 वा ते 21.00वा चे मुदतीत सविस्तर सापळा पंचनामा करणेत आला असून पंचनाम्याप्रमाणे मुद्देमाल जप्त केला आहे.एकंदरीत दिनांक 8/6/2018 रोजी यातील आरोपी लोकसेवक खँबर शरपुद्दीन नायकवडी वय 57, अव्वल कारकून अभिलेख विभाग तहसील कार्यालय करवीर रा नायकवडी गल्ली कागल ता कागल यांनी आपले लोकसेवक पदाचा दुरुपयोग करुन भ्रष्ट व बेकायदेशीर मार्गाने स्वताचा आर्थिक लाभ करुन घेण्याचे उद्देशाने वैधपरिश्रमीकाखेरीज अन्य परितोषण म्हणून तक्रारदार यांचेकडे दिंडनेर्ली ता.करवीर गावचे हद्दीतील त्यांचे मालकीचे शेतजमीनींचे 7/12 उतारे देणेसाठी तडजोडीअंती पाच ते सहा हजार द्यावे लागतील असे म्हणून लाच मागणी केली. तसेच सापळा कारवाई दरम्यान पंच साक्षीदार यांचेसमक्ष तक्रारदार यांचेकडून रु.3000/- लाच रक्कम स्विकारली असता त्यांना पकडले आहे. सदर आरोपीचे कृत्य हे लाचलुचपत प्रतिबंध अधिनियम सन 1988 चे कलम 7,13(1)(ड),सह कलम 13(2) अन्वये गुन्हा होत असलेने त्यांचेविरुध्द सरकारतर्फे माझी कायदेशीर फिर्याद आहे.

**13. Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.**
(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

**(1) Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम **or**

**(2) Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव): ACB **Rank** (पद): SP (Superintendant of Police)
**No.**(क्र.): **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

**(3) Refused investigation due to** (ज्या

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास

**(4) Transferred to P.S.**(गुन्हा **District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**14. Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा): पो.उप अधीक्षक ए.सी.बी. कोल्हापूर

**15. Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)
ठाणे अंमलदार लक्ष्मीपुरी पोलीस ठाणे

**Name** (नाव): tanaji digambar sawant
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): 100

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र):

**Physical features, deformities and other details of the suspect/accused: ( If known / seen )**
(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ | Build (बांधा) | Height(cms.) (उंची(सें.मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark(s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| | | | | | | चेचक के दाग: NO |
| 1 | पुरुष | | | | | |

| Deformities/ Peculiarities (व्यंग/वैशिष्टये) | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा/बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)